# जनसंपर्क अधिकारी

**मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट २५२-२२** **दिनांक १५/०८/२०२२**

## ७५ व्या स्वातंत्र्य दिनानिमीत्त मि.भा.व.वि. आयुक्त कार्यालय येथे मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते ध्वजारोहण.

७५ व्या स्वातंत्र्य दिनानिमीत्त (अमृत महोत्सवी वर्ष) मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्त कार्यालय येथे मा. पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सदर ध्वजारोहण कार्यक्रमप्रसंगी विशेष निमंत्रित व्यक्ती म्हणून ७५ वर्ष पुर्ण झालेल्या व माहे ऑगस्ट १९४७ मध्ये जन्म दिनांक असणाऱ्या मिरा-भाईंदर,वसई-विरार मधील ज्येष्ठ नागरिकांना पोलीस आयुक्त कार्यालयामध्ये आंमत्रीत करण्यात आले होते. सदरवेळी ध्वजारोहणासाठी उपस्थित पोलीस अधिकारी/अंमलदार यांना मार्गदर्शन करुन पोलीस विभागामध्ये कर्तव्य करतांना सर्व पोलीसांनी कुठल्याही दडपणाला न जुमानता व मोहाच्या आवरणाला बळी न पडता नागरिकांचे स्वातंत्र्य व हक्क अबादित राखले जाईल यादृष्टीने कर्तव्य करायला हवे असे मा. पोलीस आयुक्त यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थित असणाऱ्या जेष्ठ नागरिकांशी मा. पोलीस आयुक्त यांनी संवाद साधून त्यांचेसोबत अल्पोपहार केला.





मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस उपनिरीक्षक श्री. हर्षल जाधव, नेम-वाचक पोलीस उपआयुक्त कार्यालय, परिमंडळ-२ यांनी २०१६ मध्ये गडचिरोली येथे नक्षलग्रस्त भागामध्ये कर्तव्य करतांना केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल केंद्रीय मंत्रालयाकडून ‘पोलीस शौर्य पदक’ मंजुर झालेले आहे. तसेच श्री जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नयागनर पोलीस ठाणे व श्री समीर अहिरराव, पोलीस निरीक्षक,

मनुष्यवध तपास पथक, गुन्हे शाखा यांनी क्लिष्ट व थरारक गुन्हयांचा कौशल्यपुर्वक तपास करुन गुन्हयातील आरोपीतांविरुध्द सबळ पुरावे हस्तगत करुन मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केल्यामुळे केंद्रीय गृहमंत्रालयाकडून त्यांना ‘केंद्रिय गृहमंत्री पदक’ मंजुर झाल्यामुळे मा. पोलीस आयुक्त यांनी पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्कार केला आहे.



पोउपनी हर्षल जाधव यांचा मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते श्री जितेंद्र वनकोटी यांचा सत्कार



मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते श्री समीर अहिरराव यांचा सत्कार

कोविड-१९ संसर्गामध्ये मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयात कर्तव्यावर असतांना पोलीस निरीक्षक अनिल दत्तात्रय पवार, पोउपनि. प्रभाकर खोत, सहा. फौज. दिनेश भागवत कुंवर, पोहवा किरण किसन साळूंखे, पोहवा उमेश गावगर व पोना जितेंद्र भालेराव या ६ पोलीस अधिकारी/अंमलदार यांना कोविड-१९ चा संसर्ग होवून त्यांचे निधन झाले होते. मा. पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते यांचे निर्देशानुसार सदर पोलीसांच्या कुटूंबियांची पोलीस अधिकारी यांनी समक्ष भेट घेवून त्यांच्याकडे विचारपूस केली तसेच काही अडचण असल्यास संपर्क साधण्याबाबत आवाहन केले.





स्व. पोनि. अनिल पवार, यांचे कुटूंबियाची भेट    स्व. सहा.फौज. दिनेश कुंवर, कुटूंबियाची भेट

त्याचप्रमाणे मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस मुख्यालयाच्या बेव्हर्ली पार्क येथील प्रस्तावित जागेमध्ये स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मा. पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते, अपर पोलीस आयुक्त श्री श्रीकांत पाठक, पोलीस उपआयुक्त श्री विजयकांत सागर, श्री अमीत काळे व इतर ७५ पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या हस्ते ७५ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.





---ooo---